# करवीरनिवासिनी श्री महालक्ष्मीदेवी

## ( उपासनेमागील शास्त्र आणि उत्सव )

## अनुक्रमणिका

( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )


- मनोगत ६
१. श्री महालक्ष्मीदेवीच्या स्थानाचा इतिहास १०
२. साडेतीन शक्तीपिठांपैकी एक १०
३. देवळाची रचना आणि मूर्ती २२
४. देवीच्या देवळात करावयाच्या काही नेहमीच्या धार्मिक कृती २४
    * कुंकुमार्चन २४
    * देवीची ओटी भरणे २६
५. श्री महालक्ष्मी देवस्थानातील काही महत्त्वाचे उत्सव २८
    * शारदीय नवरात्रोत्सव २९
    * दीपोत्सव २९
    * किरणोत्सव आणि त्या वेळचे सूक्ष्म-चित्र २९
६. नवरात्रातील देवीच्या उपासनेमागील शास्त्र ५२
    * घटस्थापना करणे (सूक्ष्म-चित्र) ५२
    * अखंड दीपप्रज्वलन (सूक्ष्म-चित्र ) ५४
    * कुमारिका-पूजन (सूक्ष्म-चित्र) ५६
    * भोंडला खेळणे ५८
    * गरबा खेळणे ५९
    * घागर फुंकणे ५९
    * श्री दुर्गादेवीचा नामजप ६०
७. चंडीविधान ६०
८. कुलदेवतेच्या नामजपाचे महत्त्व ६१

९. अनुभूती ६२
१०. धर्महानी करणारे अपप्रकार रोखणे, हे काळानुसार आवश्यक धर्मपालनच ! ६४
- ।। श्रीमहालक्ष्म्यष्टकम् ।। ६९

# मनोगत

करवीर (कोल्हापूर) क्षेत्री असलेले श्री महालक्ष्मीदेवीचे स्थान हे आजही जागृत शक्तीपीठ आहे. ‘अंबाबाई’ या नावाने सुपरिचित असलेल्या या देवीचे हे स्थान ‘दक्षिण काशी’ म्हणूनही ओळखले जाते.

लक्षावधी भाविक आपल्या या कुलदेवीच्या दर्शनाला जातात. कित्येक जण नवस करतात, तर कित्येक जण तिच्या कृपेसाठी विधी-अनुष्ठाने करतात. या सर्वांच्या मनात देवीविषयी श्रद्धा असते; पण बहुतेकांना उपासनेमागील शास्त्र ज्ञात नसते. उपासनेमागील शास्त्र ठाऊक असेल, तर उपासना अधिक भावपूर्ण होते. तसेच उपासनेतील कृती योग्यरीत्या केल्यास, त्या कृतींद्वारे मिळणारी फलप्राप्तीही अधिक असते. या दृष्टीने या लघुग्रंथात उपासनेतील काही कृती आणि त्यांमागील शास्त्र सांगितले आहे. कुंकुमार्चन, ओटी भरणे, देवीचा किरणोत्सव इत्यादींच्या वेळी सूक्ष्म-स्तरावर नेमकी काय प्रक्रिया घडते, हे दर्शवणारी ‘सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे’ पाहिल्यास शास्त्र सहज आकलन होते.

देवीचे माहात्म्य, देऊळ, मूर्ती इत्यादींविषयीचे विवरण देवीविषयीच्या उपलब्ध ग्रंथांतून घेतले आहे, तर उपासनेच्या कृती आणि शास्त्र म्हणजे, सनातनच्या साधकांना ईश्वरी कृपेमुळे लाभलेले दिव्य ज्ञानामृतच आहे. या ज्ञानामृताचे प्राशन करून भाविकांकडून देवीची उपासना भक्तीभावाने घडून त्यांच्यावर तिची अपार कृपादृष्टी रहावी, ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! - **संकलक**